


दैनिक जनसामान्यांचे शस्त्र ● बीड, छ.संभाजीनगर, जालना, नांदेड, परभणी, लातूर, धाराशिव ●

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे — https://epaper.marathwadapatra.com




बीड ● वर्ष ४ थे ● अंक २४० वा ● पाने-४ ● शनिवार, दि.०७ डिसेंबर २०२४ ● पान -१ ● RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 ● Post : Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 ● dailymarathwadapatra2021@gmail.com किंमत ३ रूपये

# जरांगे विरूद्ध फडणवीस संघर्ष पुन्हा पेटणार ?

## शपथविधी होताच पाटलांचा राज्य सरकारला अल्टिमेटम

मुंबई, दि. ५ (वृत्तसेवा):-विधानसभा निवडणुकीत महायुतीला प्रचंड मोठं बहुमत मिळाल्यानंतर काल (५ डिसेंबर) भाजापाचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली आहे. त्यांच्याबरोबरीने शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादीचे अजित पवार यांनीदेखील उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली आहे. दरम्यान हा शपथविधी झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला एक महिन्याचा अल्टिमेटम दिला आहे. येत्या ५ जानेवारीपर्यंत मराठा आरक्षणाचा मुद्दा मार्गी लावावा, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले आहेत.



### मनोज जरांगे पाटील काय म्हणाले ?

राज्यात स्थापन झालेल्या महायुती सरकारबद्दल बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, ''सरकार स्थापन झालं आहे, आता जनतेचे प्रश्न मार्गी लावणे गरजेचे आहे. जी समाजातील खदखद त्यांना दिसत नसेल, पण ती इतकी भयंकर सुप्त लाट आहे की ते त्रासून जातील. काल ५ तारखेला त्यांचं सरकार स्थापन झालं आहे. त्यांना आम्ही शुभेच्छा दिल्या आहेत. तिघांचेही मनापासून अभिनंदन''.

गेल्या अनेक दिवसांपासून मनोज जरांगे पाटील हे मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर आंदोलन करत आहेत. यादरम्यान त्यांनी अनेकदा भाजपाचे नेते देवेंद्र फडणवीस यांच्यावर सडकून टीकादेखील केली आहे. मागच्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री राहिलेले देवेंद्र फडणवीस हे आता मुख्यमंत्री बनले आहेत. त्यामुळे मनोज जारांगे यांच्या आगामी काळातील आंदोलनादरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विरुद्ध मनोज जरांगे पाटील असा सामना पाहायला मिळू शकतो. ''पुढच्या काळात गोरगरीबांचे प्रश्न मार्गी काढावे. कारण ५ तारखेला त्यांचा शपथविधी झाला, आता येत्या ५ तारखेपर्यंत म्हणजेच ५ जानेवारीपर्यंत या एक महिन्यात त्यांनी मराठा ▶▶पान २ वर

# बीडच्या मोंढा रोडसह शहरातील अनेक रस्ता कामांना आठवडाभरात प्रत्यक्ष होणार सुरुवात

## पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून निधी : अमर नाईकवाडे यांनी मानले आभार

बीड, दि.६ (मराठवाडा पत्र न्युज):- बीड शहराच्या दोन महत्वाच्या भागांना जोडणार्या जालना रोड ते अमरधाम स्मशानभूमी (मोंढा रोड) या सिंमेट रस्ता कामाला मंजुरी मिळाली आहे. महत्वाचे म्हणजे सध्या या रस्ता कामाची टेंडर प्रक्रिया सुरु असून या आठवड्यात कार्यारंभ आदेश निर्गमित होतील. सध्या सुरू असलेला पाऊस कमी होताच राज्याचे कृषी मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजयजी मुंडे यांच्या हस्ते येत्या आठ ते दहा दिवसात या रस्ता कामांना प्रत्यक्षात सुरुवात होणार आहे अशी माहिती नगरसेवक अमर नाईकवाडे व गटनेते फारुख पटेल यांनी दिली आहे. दरम्यान या रस्त्यामुळे शहरातील अत्यंत महत्त्वाच्या आणि रहदारीच्या भागाला चांगल्या सुविधा मिळणार असून वाहतुकीचा प्रश्न मार्गी लागणार असल्याचे अमर नाईकवाडे व फारुख पटेल यांनी म्हटले आहे. जिल्हा नियोजन समितीच्या



माध्यमातून २०२४-२५ अंतर्गत शिवशारदा बिल्डिंग (जालना रोड) ते अमरधाम स्मशानभूमी (मोंढा रोड) पर्यंतचा रस्ता तसेच हा दुभाजकासह सिमेंट काँक्रेटचा करण्यात यावा अशी आग्रही मागणी नगरसेवक अमर नाईकवाडे व फारुख पटेल यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजयजी मुंडे यांच्याकडे केली होती. त्यांच्या ▶▶पान २ वर

### पालकमंत्री मुंडे, अमरसिंह पंडित यांचे मानले आभार

टेंडर प्रक्रिया पूर्ण होताच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. नव्या आणि जुन्या बीड शहराला जोडणार्या या महत्वाचे रस्ता काम मार्गी लावल्याबद्दल अमर नाईकवाडे यांनी पालकमंत्री धनंजय मुंडे तसेच माजी आमदार अमरसिंह पंडित यांचे आभार मानले आहेत. लवकरच मोंढा रोडसह बीड शहरातील सर्वच मंजूर करण्यात आलेल्या विकास कामांचे उद्घाटन पालकमंत्र्यांच्या हस्ते करून प्रत्यक्ष कामास सुरुवात होणार आहे अशी माहिती अमर नाईकवाडे यांनी दिली आहे.

# महापालिका निवडणुकांसाठी राज ठाकरे महायुतीत ?

## देवेंद्र फडणवीसांचे मोठे सूतोवाच



मुंबई, दि. ६ (वृत्तसेवा):- मुंबईतील आझाद मैदानावर महायुती सरकारचा महाशपथविधी सोहळा अगदी दिमाखदार पद्धतीने संपन्न झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह एनडीएतील राज्यांचे मुख्यमंत्री, दिग्गज उद्योगपती, अभिनेते-कलाकार, क्रिकेट विश्वातील मंडळी, संत-महंत तसेच हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची, एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्रीपदाची आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. यानंतर आता विधिमंडळाचे विशेष अधिवेशन घेऊन आमदारांना शपथबद्ध केले जाणार आहे. यातच राज ठाकरेमहायुती सरकारमध्ये सहभागी होणार का, याबाबत देवेंद्र फडणवीस यांनी मोठे विधान केले आहे. यंदाची विधानसभा निवडणूक राज ठाकरे यांच्या मनसे पक्षाने स्वबळावर लढली होती. परंतु, मनसे पक्षाचा एकही उमेदवार निवडून आला नाही. राजपुत्र अमित ठाकरे, बाळा नांदगावकर, संदीप देशपांडे, अविनाश जाधव, गजानन काळे यांच्यासह सर्व उमेदवार पराभूत झाले. एकमेव आमदार असलेले राजू पाटील हेही आपली आमदारकी वाचवू शकले नाहीत. दारुण पराभवानंतर मनसे पक्षाच्या मान्यतेविषयी प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याची चर्चा आहे. यातच आता ठाकरे गटाने महापालिका निवडणुकांसाठी कंबर कसली असून, उद्धव ठाकरेंनी कामाला लागण्याचे आदेश दिले आहेत. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हळूहळू पक्षांनी चाचपणी करण्यास सुरुवात झाल्याचे चित्र आहे. याबाबत देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या विधानामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना सुरुवात झाल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, लोकसभेत त्यांनी आम्हाला खुलेपणाने पाठिंबा दिला. आम्हाला त्याचा फायदा झाला. विधानसभेत आमच्या हे लक्षात आले की, त्यांच्यासमोर महाराष्ट्रात त्यांचा पक्ष आहे. त्यांच्या लोकांनी निवडणुकाच लढल्या नाहीत तर तो पक्ष चालेल कसा? आमच्याकडे त्यांना देण्यासाठी जागाच नव्हत्या. आम्ही तीन पक्ष होतो. ही वस्तुस्थिती समजून त्यांनी विरोधात लढण्याचा निर्णय घेतला. इतक्या मोठ्या प्रवाहाच्या विरोधात ते लढले. पण त्यांना मते चांगली मिळाली आहेत. त्यांच्या अनेक उमेदवारांनी अतिशय चांगली मते घेतली आहेत. मला वाटते की, त्यांचे आणि आमचे विचार मोठ्या प्रमाणावर एकसारखे आहेत. त्यांना सरकारसोबत ठेवण्यात आम्हाला नक्कीच रस आहे. आनंद आहे. महापालिकेच्या निवडणुकीत जिथे शक्य असेल, तिथे त्यांना सोबत घेता आले तर आम्ही प्रयत्न करू, ▶▶पान २ वर

# खळबळजनक : स्वाराती रुग्णालयास बनावट औषधींचा पुरवठा

## ठाणे,गुजरातमधील चौघांवर गुन्हा

अंबाजोगाई, दि. ०६ (मराठवाडा पत्र न्युज):- गोरगरीब रुग्णांवरील उपचारासाठी आधारस्थान असलेल्या अंबाजोगाईच्या स्वाराती रुग्णालयास बनावट औषधींचा पुरवठा करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी ठाणे आणि सुरत (गुजरात) मधील चौघांवर गुन्हा दाखल झाला आहे.ङ्गङ्गसध्याच्या खाजगी रुग्णालयातून मिळणाऱ्या महागड्या उपचारपद्धतीमुळे गोरगरीब आणि सर्वसामान्य रुग्ण स्वस्त आणि खात्रीपूर्वक उपचारासाठी स्वाराती रुग्णालयास प्राधान्य देतात. एका अर्थाने हे रुग्णालय गोरगरिबांसाठी जीवनवाहिनी आहे. मात्र या रुग्णालयात महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या औषध पुरवठा ▶▶पान २ वर




# अज्ञात वाहनाच्या धडकेत एक ठार




अंबाजोगाई, दि. ६ (मराठवाडा पत्र न्युज):- अंबाजोगाई-लातूर रोड वरील सेलू अंबा टोल नाक्या नजीक अज्ञात वाहनाने दुचाकी जोराची धडक दिल्याने झालेल्या अपघातात एक जागीच ठार तर एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना आज दुपारी घडली. या जखमीस स्वाराती रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या विषयी प्राप्त माहिती अशी की, अंबाजोगाई शहरातील रमाबाई आंबेडकर चौका नजीकच्या वसाहती मध्ये राहणारा रणजित बालाजी चिकटे वय २५ हा आपल्या मित्रांसह एम एच २५ एए ८८८२ या दुचाकी हुन जात असताना अंबाजोगाई लातूर रोड वरील सेलू अंबा टोल नाक्या नजीक अज्ञात वाहनाने या दुचाकीला जोराची धडक दिल्याने अपघातात रणजित बालाजी चिकटे हा जागीच ठार झाला तर त्याचा सहकारी हा गंभीर जखमी झाल्याने त्याला येथील स्वा रा ती रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले असून त्याचे नाव प्राप्त झालेले नाही.

# भाजपाचे ज्येष्ठ नेते मधुकर पिचड यांचं निधन



नाशिक, दि. ६ (वृत्तसेवा) :- भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री मधुकर पिचड यांचं निधन झालं आहे. गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती खालावली होती. मधुकर पिचड यांना ऑक्टोबरमध्ये ब्रेन स्ट्रोकचा झटका आला होता. त्यानंतर त्यांना नाशिकमधील नाईन पल्स रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं होतं. तेव्हापासून मधुकर पिचड यांच्यावर उपचार सुरु होते. मात्र, आज (६ डिसेंबर) वयाच्या ८४ व्या वर्षी त्यांनी ▶▶पान २ वर

# लाडक्या बहिणींसाठी आनंदाची बातमी !

## योजनेच्या पडताळणीबाबत शिंदेंच्या शिवसेनेकडून सरकारची भूमिका स्पष्ट

मुंबई, दि.६ (वृत्तसेवा) :-महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी (५ डिसेंबर) शपथविधीनंतर प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी त्यांनी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'बाबत महत्त्वाचं वक्तव्य केलं आहे. यावेळी फडणवीस म्हणाले, ''लाडकी बहीण योजना आम्ही सुरुच ठेवणार आहोत. तसेच या योजनेअंतर्गत पात्र महिलांना २,१०० रुपयांचे हप्तेही देणार आहोत. आता अर्थसंकल्पात त्याचा विचार आम्ही करू. आपले आर्थिक स्रोत चॅनलाईज्ड झाल्यानंतरच हे करणं शक्य आहे. निवडणुकीपूर्वी प्रचारकाळात आम्ही जी आश्वासनं दिली आहेत ती आश्वासनं आम्ही पूर्ण करू. त्यासाठी ज्या व्यवस्था करायच्या आहेत त्या आम्ही आधी करणार आहोत. स्क्रुटिनी म्हणजेच पडताळणीबद्दल बोललं जातंय, त्याबद्दल इतकंच सांगेन की निकषांबाहेर कुणी योजनेचा लाभ घेतला असेल किंवा काही तक्रारी आल्या असतील तर त्यावर आमचं लक्ष असेल. कारण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकरी सन्मान योजना सुरू केल्यानंतर काही काळाने योजनेच्या पहिल्या टप्प्यात असं लक्षात आलं की काही मोठ्या शेतकऱ्यांनीही या योजनेचा लाभ घेतला आहे. त्यानंतर अनेक शेतकऱ्यांनी स्वतःच सांगितलं की आम्ही निकषात



बसत नाही. अशाच पद्धतीने लाडकी बहीण योजनेत निकषांच्या बाहेरच्या काही बहिणी आढळल्या तर त्याचा पुनर्विचार होईल. परंतु, सरसकट पुनर्विचार केला जाणार नाही''. या योजनेतील अर्जांची पडताळणी केली जाईल अशी चर्चा आहे. त्यातच फडणवीसांनी देखील पडताळणीचा उल्लेख केल्यानंतर असं म्हटलं जाऊ लागलं आहे की या योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांच्या अर्जांची पडताळणी करून त्यापैकी अनेक महिलांचे अर्ज बाद होतील. मात्र यावर आता शिवसेनेने (शिंदे) सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. शिवसेनेचे प्रवक्ते व आमदार संजय शिरसाट म्हणाले, ''देवेंद्र फडणवीसांनी म्हणाल्याप्रमाणे लाडकी बहीण योजनेतील पात्र महिलांच्या अर्जांची पडताळणी केली जाणार याचा अर्थ असा होत नाही की या योजनेतील पात्र महिलांना बाद केलं जाईल. त्यांनी एवढंच सांगितलं आहे की चुकीचे दस्तावेज देऊन कोणीही या योजनेचा लाभ घेऊ नये. कोणीही या योजनेचा गैरफायदा घेऊ नये, एवढंच त्यांनी सांगितलं आणि हाच त्या पडताळणीमागचा उद्देश आहे. ज्यांचे अर्ज वैध आहेत, ज्यांचे दस्तावेज वैध आहेत त्यांच्यावर कुठलीही गदा येणार नाही''.

# सावली, सावट, सौजन्य, सावज!

'काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नव्या रचनेत उपमुख्यमंत्रीपद स्वीकारणार नाहीत,' 'शिंदे यांनी उपमुख्यमंत्रीपद स्वीकारले नाही तर आम्ही पण मंत्रीपदाची शपथ घेणार नाही' हा त्यांच्या साजिंद्यांचा पवित्रा हे फार फार तर विनोद ठरतात. त्यातही केविलवाणे असे. शपथविधीच्या काही तासांपर्यंत शिंदे उपमुख्यमंत्रीपद स्वीकारणार की नाही, ही संदिग्धता कायम होती, हाही असाच विनोद. इलेक्ट्रॉनिक माध्यमे बराच काळ या विनोदावर चर्चा करत राहिली. त्यांचे ठीक. एरवीही वेळ कसा भरून काढायचा असा प्रश्न त्या बिचाऱ्यांस असतो. शिंदे यांनी काही काळापुरता तरी तो सोडवला. तथापि निवडणुकांचे निकाल लागले त्या दिवसापासून काही गोष्टी सूर्यप्रकाशाइतक्या स्पष्ट होत्या. मुख्यमंत्रीपद भाजपकडे जाणार, मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस यांचीच निवड केली जाणार आणि एकनाथ शिंदे-अजितदादा यांना उपमुख्यमंत्रीपदावर समाधान मानावे लागणार. यातील अजितदादांचा प्रश्न नाही. ते उपमुख्यमंत्रीपदाला चटावलेले आणि सरावलेलेही आहेत. या पदावर समाधान मानण्याची त्यांची चिकाटी तशी कौतुकास्पद. अर्थात त्याखेरीज त्यांना पर्याय नाही, हेही खरेच. हेच सत्य एकनाथ शिंदे यांच्याबाबतही लागू होते. पण त्यांना ते स्वीकारणे जड जात होते. साहजिक आहे तसे होणे. मुख्यमंत्रीपदावरून उतरायचे आणि लगेच उपमुख्यमंत्रीपदावर समाधान मानायचे ही अवघड बाब. पण ती गोड मानून घेण्याखेरीज त्यांस पर्यायही नाही. तो नव्हताही. त्यामुळे 'शिंदे हे उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार की नाही' या प्रश्नास तो विचारण्यास सुरुवात झाल्यापासून अर्थ नव्हता. जे झाले ते नाटक होते. तेही अगदीच किरकोळ आणि लुटपुटुचे. या नाटकात खुद्द शिंदे यांची नायकाची भूमिका काढून घेतली गेलेली असताना त्यांच्या बाकीच्या प्याद्यांच्या आवेशास काहीही अर्थ नाही. हे वास्तव लक्षात घेतल्यास शिंदे यांची अडचण सहज समजून घेता येईल. म्हणजे २०२२ पर्यंत त्यांचा काळ आधी बाळासाहेब ठाकरे आणि नंतर उद्धव ठाकरे यांच्या सावलीत गेला. आपण आनंद दिघे यांची सावली होतो, याचा तर शिंदे यांना अभिमान होता. त्याही काळात त्यांना महत्त्व होते. पण सावलीत राहून. नंतरच्या बंडामुळे त्यांना मुख्यमंत्रीपद मिळाले. त्यामुळे या पदाच्या सावलीत त्यांना पुढची अडीच वर्षे वावरता आले. या पदाची ताकदच अशी असते की बाबासाहेब भोसले, शिवाजीराव निलंगेकर पाटील आदी तुलनेने चेहराशून्य नेत्यांनाही मोठे करते. त्या तुलनेत शिंदे यांचे कर्तृत्व निश्चितच लक्षणीय आहे. शिवसेनेसाठी महत्त्वाचा ठाणे जिल्हा त्यांनी आपल्या खांद्यावर उचलून धरला होता. त्यात त्यांची कष्ट करण्याची क्षमता. यामुळे खरे तर सेनेत असतानाही मुख्यमंत्रीपदाचे दावेदार ठरू शकले असते. पण ते पद न मिळाल्यामुळे आणि मिळण्याची शक्यताही नसल्यामुळे भाजपने त्यांना हेरले आणि फुटीच्या जाळ्यात शिंदे सहज ओढले गेले. त्यात भाजपने त्यांना मुख्यमंत्री केल्यामुळे शिंदेंचा पुढचा प्रवास सुलभ झाला. त्या प्रवासात शिंदे यांना मिळालेला आधार दुहेरी होता. एक म्हणजे मुख्यमंत्रीपदाने दिलेला आणि दुसरा हे पद देणाऱ्या भाजपच्या 'महाशक्ती'कडून मिळत असलेला. पण निवडणुका झाल्या, भाजपने स्वत:च्या घवघवीत यशासाठी आखलेली चतुर समीकरणे यशस्वी ठरली. त्याचा थेट परिणाम म्हणजे शिंदे यांनी हे दोन्हीही आधार गमावले. मुख्यमंत्रीपद त्यांना भाजपच्या यशामुळे नाकारले गेले आणि ते पद नसल्यामुळे दिल्लीच्या 'महाशक्ती'चीही त्यांना आधार देण्याची गरज संपली. म्हणजे यापुढे शिंदे यांना जी काही उरलीसुरली शिवसेना आहे, ती स्वत:च्या बळावर चालवावी लागेल. या



शिवसेनेच्या यशात यापुढे भाजपला स्वारस्य असेलच असे नाही. त्या पक्षास रस होता मूळ शिवसेना फोडण्यात. त्यात ते यशस्वी झाले. आता 'अर्ध'मेल्या शिवसेनेचे काय करायचे हा त्या शिवसेनेच्या नेत्यांचा प्रश्न. भाजपस त्यात रस असण्याची शक्यता नाही. तथापि याच विधानाचा पुढचा भाग असा की शिंदे यांच्या साजिंद्यांनाही त्यांच्या शिवसेनेत यापुढे रस असेलच असे नाही. खरे तर या मंडळींसमोर शिवसेना काय आणि भाजप काय वा राष्ट्रवादी काय किंवा काँग्रेस काय, हे मुद्देच नाहीत. त्यांचे लक्ष्य होते/ आहे/ असेल ते फक्त सत्ता या एका घटकात. ती जो देईल त्यामागे ही प्यादी धावतील. त्यामुळे 'शिंदे सरकारात सहभागी झाले नाहीत तर आम्हीही मंत्रीपद स्वीकारणार नाही' या यातील काही नेत्यांच्या आविर्भावावर तान्हे, शेंबडे, अगदी दुपट्यातले पोरही विश्वास ठेवणार नाही. सत्य असे की शिंदे यांनी खरोखरच मंत्रिमंडळात सहभागी न होण्याचा निर्णय अमलात आणला असता तर यातील काहींनी भाजपच्या दारात जाऊन आमच्या पदरात काही तरी वाढा, अशी भिक्षा मागण्यास कमी केले नसते. शिंदे नाहीत तर नाही, आम्हाला तरी काही द्या, असाच या मंडळींचा पवित्रा राहिला असता. आणि याची जाणीव असल्यानेच शिंदे यांनी मंत्रिमंडळात सहभागी होण्याचा शहाणपणा दाखवला. अन्यथा तेलही गेले, तूपही गेले या उक्तीप्रमाणे त्यांच्या हाती धुपाटणेही राहिले नसते. हीच बाब अजितदादा यांची. ते उगाच मंत्रिमंडळात मी जाणार नाही वगैरे नैतिक भूमिका घेण्याच्या फंदात पडले नाहीत. कायम सत्तासावलीत राहिलेले असल्याने त्यांच्यासाठी सत्तेखेरीज जगणे म्हणजे माशास पाण्याबाहेर जगावे लागण्याइतकेच अवघड. ती वेळच त्यांनी येऊ दिली नाही. हे दोघे काही महत्त्वाच्या खात्यांसाठी आग्रही असल्याचे सांगितले जाते. त्यातही फार तथ्य नाही. भाजप देईल ती खाती या उभयतांस स्वत:साठी आणि आपापल्या साजिंद्यांसाठी स्वीकारावी लागतील. उगाच 'गृह खाते मलाच हवे' आणि 'अर्थ खात्यावर माझा अधिकार' वगैरे शौर्यदर्शक विधानांमुळे कोणीही बधणारे नाही. त्यास इलाजही नाही. जे भाजप म्हणेल तेच त्यांस ऐकावे आणि करावे लागेल. म्हणून यापुढील काळात या पक्षांच्या अस्तित्वाचा प्रश्न त्या पक्षांपेक्षा भाजपलाच अधिक पडणार आहे. याचे साधे कारण असे की भाजपस यापुढील काळात या पक्षांच्या अस्तित्वाची अजिबात गरज नाही. आपल्या एकट्याच्या बळावर जो पक्ष २८८ सदस्यांच्या विधानसभेत १३२ पर्यंत पोहोचतो, त्यास अन्य कोणाच्या शिड्यांची गरज राहत नाही. म्हणजेच आणखी काही काळाने हे दोन पक्ष भाजपच्या गळ्यातील लोढणे बनणार. कधी इतकाच काय तो प्रश्न. तसे झाल्यावर भाजप आणखी किती काळ हे लोढणे वागवेल? आणि ते त्याने वागवावे का? यातील अजितदादा काय वा एकनाथ शिंदे काय! हे दोघे आतापर्यंत अनुक्रमे शरद पवार आणि ठाकरे कुटुंबीय यांच्या सावलीत वाढले. मोठे झाले. आता ही सावली संपली. आता त्यांची पुढची वाटचाल उभयतांस भाजपच्या सावटाखाली करावी लागेल. सावली आणि सावट यांतील फरक त्यांना यापुढे कळेलच. पण त्याचबरोबर भाजप आणखी किती काळ सौजन्य दाखवतो याचेही उत्तर मिळेल. शिंदे यांच्या नाकदुऱ्या भाजपने काढल्या, ते शपथविधीला माजी मुख्यमंत्री हवे होते म्हणून. ते आता मिळाले. यापुढे भाजप हे आणि इतके सौजन्य दाखवेलच याची शाश्वती नाही. किंबहुना ते न दाखवले जाण्याचीच शक्यता अधिक. त्यामुळे या दोघांचा प्रवास सावलीतून सावटाखाली सौजन्याच्या प्रतीक्षेत सुरू राहणार असला तरी आपण सावज ठरणार नाही याची खबरदारी त्यांना घ्यावी लागेल. ती ते किती घेतात यावर त्यांच्या पक्षांचे अस्तित्व अवलंबून राहील.

# दत्त जयंती मार्गशीर्ष नवरात्र महोत्सवात विविध धार्मिक कार्यक्रम

अंबाजोगाई, दि.६(मराठवाडा पत्र न्युज) :- अनेक वर्षाची परंपरा लाभलेला तसेच सांस्कृतिक व कलात्मक दृष्टीने महत्वपुर्ण व असलेला दत्तजयंती मार्गशिर्ष नवरात्र महोत्सव ८ डिसेंबर ते १६ डिसेंबर या कालावधीत दत्त संस्थान थोरले व धाकटे देवघर येथे संपन्न होत असून यात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती पत्रकार राहुल देशपांडे यांनी दिली.दत्तजयंती नवरात्र महोत्सवानिमित्त दत्त संस्थान थोरले देवघर येथे संपन्न होणाऱ्या कार्यक्रमात सकाळी अभिषेक,मंत्र अनुष्ठान,वेदोक्त श्लोक, त्र,अष्टक,जयंती, महानिरांजन,प्रदक्षिणा,दासोपंत रचित भजन आदी कार्यक्रम होतील.८ ते १३ डिसेंबर या कालावधीत रात्रो नृत्य,गायन,प्रवचन,



किर्तन दि.१० ते १३ डिसेंबर रोजी दुपारी धार्मिक कार्यक्रम ११ डिसेंबर रोजी रात्री उशिरा मंदीर परिसरात १२ व १४ डिसेंबर रोजी सायंकाळी व रात्री उशिरा मंदिर परिसरात पालखी १४ डिसेंबर रोजी दत्तजयंती निमित्याने दुपारी भक्ती गीत गायन आणि सायंकाळी गुरूपुजन व अवतारोत्सव सोहळा १५ डिसेंबर रोजी प्रातःसमयी भजन, पालखी व दत्त सहस्त्रनाम, षोडशावतार हवन (होम) होवुन पुर्णाहुतीचा कार्यक्रम होईल. दि.१६ डिसेंबर रोजी प्रातःसमयी भजन,पालखी सोहळा त्यानंतर लळीत लोककला सादरीकरणाने दत्तजयंती मार्गशीर्ष नवरात्र महोत्सवाची सांगता होईल.या सर्व कार्यक्रमास भाविकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# अवकाळीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून सरसकट भरपाई द्या

## आ.क्षीरसागरांची प्रशासनाकडे मागणी



बीड, दि.६ (मराठवाडा पत्र न्युज):- बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रासह बीड जिल्ह्यात शुक्रवारी (दि.६) रोजी सकाळपासून अवकाळी पाऊस सुरू आहे. या अवकाळी पावसाने शेती पिकांचे आणि फळबागांचे नुकसान झाले आणि होत आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने नुकसानीचे पंचनामे करून सरसकट भरपाई देण्यासाठी कार्यवाही करावी अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. शुक्रवारी (दि.६) रोजी सकाळपासूनच बीड मतदारसंघातील बीड आणि शिरूर का. तालुक्यासह बीड जिल्ह्यात अवकाळी पाऊस होत आहे. या पावसाने शेतीपिकांचे आणि फळबागांचे नुकसान झाले आहे तसेच होणार आहे. त्यामुळे प्रशासनाने अवकाळी पाऊस हे कारण नियमोचीत दाखवून झालेल्या नुकसानीची तक्रार क्रॉप इन्शुरन्स ॲपवर करण्यासाठी तलाठी व संबंधित यंत्रणेच्या मार्फत शेतकर्यांना कळवावे. तसेच प्रशासनाने घटनास्थळी जाऊन पंचनामे करावेत आणि शेतकरी बांधवांना सरसकट नुकसान भरपाई मिळवून द्यावी अशी मागणी बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाकडे केली आहे. याबाबत आ.क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री, मुख्य सचिव, विभागीय आयुक्त, कृषी आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा कृषी अधीक्षक व तहसिलदार बीड आणि शिरूर का. यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे.

# नविद मुश्रीफ यांची राजकिशोर मोदी यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट



अंबाजोगाई, दि.६ (मराठवाडा पत्र न्युज):- सरसेनापती संताजी घोरपडे शुगरचे अध्यक्ष तथा राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री ना हसन मुश्रीफ यांचे सुपुत्र नविद मुश्रीफ हे अंबाजोगाई शहरात आले असतांना त्यांनी राजकिशोर मोदी यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचे स्वागत श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारी संचालक संकेत राजकिशोर मोदी यांनी शाल फेटा व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. याप्रसंगी नविद मुश्रीफ व संकेत मोदी यांच्यात नुकत्याच संपन्न झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या संदर्भात तसेच राजकीय ,सामाजिक त्याचबरोबर शैक्षणिक विषयावर सांगोपांग चर्चा झाली. उभयतांनी आपापल्या क्षेत्रातील विविध प्रकारचे अनुभव व किस्से सांगितले. संकेत मोदी यांनी अंबाजोगाई शहरासाठी राजकिशोर मोदी यांनी मागील चाळीस वर्षात राबविलेल्या विविध विधायक उपक्रमाविषयी माहिती नविद मुश्रीफ यांना दिली. त्याचबरोबर अंबाजोगाई शहरात सुरू केलेल्या आर्थिक संस्थेची देखील सविस्तरपणे चर्चा केली. नविद मुश्रीफ यांनी देखील अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँक व त्यांचा विस्तारीत शाखांविषयी जाणून घेतल्यावर आनंद व्यक्त करत राजकिशोर मोदी व संकेत मोदी यांचे अभिनंदन केले. मोदी लर्निंग सेंटरच्या माध्यमातून आजपर्यंत अनेक मोठमोठे अधिकारी, डॉक्टर, इंजिनिअर , वैज्ञानिक तसेच खेळाडू तयार झाल्याचे समजल्यावर अंबाजोगाई शहरातील शैक्षणिक वातावरण व येथील यशस्वी विद्यार्थ्यांचे देखील कौतुक व अभिनंदन करत आपल्या वतीने देखील कार्यक्षेत्रात असेच विधायक उपक्रम राबविण्याची इच्छा व्यक्त केली.

# ज्ञान,संस्कार,आहार व आरोग्यावर ज्ञानदीप विद्यालयात विद्यार्थ्यांना आर्य समाजचे वतीने मार्गदर्शन

किल्लेधारूर, दि. ६ (मराठवाडा पत्र न्युज): - महाराष्ट्र नवनिर्माण अभियान व आर्य समाज धारूर यांच्या संयुक्त विद्यमाने ०१ डिसेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीमध्ये संपूर्ण महाराष्ट्रभर विद्यालयीन विद्यार्थ्यांना ज्ञान, संस्कार, आहार व आरोग्य याविषयी विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यामध्ये ज्ञानदीप विद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रमुख मार्गदर्शक दयानंद महाविद्यालय लातूरचे सेवानिवृत्त प्रा चंद्रेश्वरजी शास्त्री यांनी विद्यार्थ्यांना ज्ञान, संस्कार, आहार व आरोग्य याविषयी सखोल असे मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. महाराष्ट्र मानव निर्माण अभियान व आर्य समाज संस्थान किल्ले धारूर यांच्या संयुक्त विद्यमाने ज्ञानदीप विद्यालयातील विद्यार्थ्यांना ज्ञान, संस्कार, आहार व आरोग्य




या विषयी व्याख्यानमालेचे आयोजनकरण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणूणधारूर आर्य समाजचे प्रधान प्रमोदकुमार तिवारी होते तर प्रमुख मार्गदर्शक दयानंद महाविद्यालय लातूरचे सेवानिवृत्त प्रा. चंद्रेश्वरजी शास्त्री तसेच प्रमुख अतिथी म्हणून अभिषेकजी शास्त्री, अड प्रमोदकुमार मिश्रा सोमनाथअप्पा कांबळे, कमलाकर इंदूरकर उद्धव खाडे हे मान्यवर यावेळी उपस्थित मान्यवरांचे विद्यालयाच्या व स्वागत सत्कार करून केला उपस्थित मान्यवर अड मिश्रा व खाडे यांनी भजन व गीत गायन करत विद्यार्थ्यांमध्ये आनंददायी वातावरण निर्माण केले. या वेळी विद्यार्थ्याना मार्गदर्शन करताना प्रा. चंद्रेश्वरजी शास्त्री यानी विद्यार्थ्यानी शिस्त व नियोजनबध्द वागणे गरजेचे असुन आहार व आरोग्याची काळजी प्रत्येकाने घेतली पाहीजे. पूस्तकी ज्ञाना बरोबर समाजातील सर्व प्रकारचे ज्ञान अवगत केले पाहीजे आपले संस्कार व संस्कृती टिकवण्या साठी सतत प्रयत्न केला पाहीजे असे सांगीतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शिक्षक मुंजाराम निरडे तर आभार शिक्षक सचिन चव्हाण यांनी केले. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी व शिक्षकवृंद उपस्थित होते.

# भ्रष्टाचाराविरोधी जागरूकता करणाऱ्या वाक्यांच्या वापरास मनाई ?

मुंबई, दि. ६ (मराठवाडा पत्र न्युज) :- भ्रष्टाचाराविरुद्ध लढा देणे हा सर्वसामान्य जनतेच्या हिताचा भाग आहे, असे स्पष्ट करून धर्मादाय संस्था य ट्रस्टच्या नावांसाठी भ्रष्टाचाराविरोधी जागरूकता करणाऱ्या वाक्यांचा वापर करण्यास मनाई करणारे धर्मादाय आयुक्तांनी २०१८ मध्ये काढलेले परिपत्रक उच्च न्यायालयाने शुक्रवारी रद्द केले. 'नाम में क्या रखा है किंवा नावात काय आहे ?' अशी टिप्पणीही न्यायालयाने हे परिपत्रक रद्द करताना केली. धर्मादाय आयुक्तांनी जुलै २०१८ मध्ये परिपत्रक काढून धर्मादाय संस्था किंवा ट्रस्टना नावांसाठी किंवा शीर्षकांसाठी भ्रष्टाचार निर्मूलन महासंघ, भ्रष्टाचार विरोधी आंदोलन, भ्रष्टाचार मुक्त भारत किंवा मानवाधिकार या वाक्यांचा वापर करण्यास मज्जाव केला होता. तसेच, ज्या संस्था किंवा ट्रस्ट या वाक्यांचा वापर करत आहेत, त्यांनी ही वाक्ये वगळण्याचे आदेशही धर्मादाय आयुक्तांनी या परिपत्रकाद्वारे दिले होते.

# कृषी पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जागा रिक्त

## आता विद्यापीठ स्तरावर विशेष प्रवेश फेरी



पुणे, दि. ६ (वृत्तसेवा):- राज्यातील चार कृषी विद्यापीठांतील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या रिक्त राहिलेल्या जागांवर विद्यापीठ स्तरावर प्रवेश दिले जाणार आहेत. त्यासाठी १० डिसेंबर रोजी जागेवरील प्रवेश फेरी राबवण्यात येणार असून, २०२४-२५साठी कृषी परिषदेच्या अंतिम गुणवत्ता यादीत समाविष्ट असलेले आणि प्रवेशित नसलेले विद्यार्थी या फेरीसाठी पात्र ठरणार आहेत. महाराष्ट्र कृषी शिक्षण आणि संशोधन परिषदेचे संचालक हरिहर कौसडीकर यांनी ही माहिती दिली. शैक्षणिक वर्ष २०२४-२५साठी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया कृषी परिषदेकडून १८ सप्टेंबर ते २५ ऑक्टोबर या कालावधीत राबवण्यात आली. भारतीय कृषी संशोधन परिषद यांच्या जागेवरील ८ नोव्हेंबर रोजी पूर्ण झाली. मात्र, भारतीय कृषी संशोधन परिषदेने पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या रिक्त राहिलेल्या जागा विद्यापीठ स्तरावर भरण्याचे निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने राज्यातील चार कृषी विद्यापीठांच्या मुख्यालयी १० डिसेंबर रोजी जागेवरील प्रवेश फेरी राबवण्यात येणार आहे. या फेरीसाठी कृषी परिषद स्तरावर या पूर्वी राबवलेल्या प्रक्रियेअंतर्गत रिक्त जागा, तसेच भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या कोट्यातील रिक्त जागा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. रिक्त जागांचा तपशीलसंकेतस्थळावर देण्यात आला आहे. २०२४-२५साठी कृषी परिषदेच्या अंतिम गुणवत्ता यादीत समाविष्ट असलेले आणि प्रवेशित नसलेले विद्यार्थी या फेरीसाठी पात्र ठरणार आहेत. राज्यातील कृषी विद्यापीठांतील प्रवेशित उमेदवारांना जागेवरील प्रवेश फेरीसाठी सहभागी होण्यासाठी त्यांना त्यांनी घेतलेला प्रवेश रद्द केल्यास जागेवरील प्रवेश फेरीद्वारे प्रवेशित विद्यार्थ्यांना कोणतीही शिष्यवृत्ती, शुल्क प्रतिपूर्ती लागू होणार नाही ही बाब लक्षात घेणे आवश्यक असल्याचे कौसडीकर यांनी परिपत्रकात नमूद केले आहे.

पान १ वरून

### जरांगे विरूध्द फडणवीस...

आरक्षणाचा विषय मार्गी काढावा, अन्यथा मराठे पुन्हा तुफान ताकदीने आंदोलनासठी उभे राहून सरकारला परेशान करणार, सोडणार नाही. ''८३ क्रमांकाला मराठा आणि कुणबी एक आहे, २००४ चा अध्यादेशात दुरूस्ती करावी, सगेसोयरेची अंमलबजावीणी करावी, हैदराबादसह सातारा संस्थान आणि बॉम्बे सरकारचे गॅझेट, या तीनही गॅझेट संबंधीच्या मागण्या, लाखो पोरांवरील दाखल झालेले गुन्हे मागे घेणे अशा आपल्या आठ ते नऊ मागण्या याच सरकारकडे केलेल्या आहेत त्या त्यांनी मार्गी काढाव्या, अन्यथा त्यांना पुन्हा मराठ्यांना सामोरे जावे लागेल'', असेही मनोज जरांगे यावेळी म्हणाले.

### बीडच्या मोंढा रोडसह...

या मागणीची दखल घेऊन पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी या रस्त्यासाठी निधी देण्याची ग्वाही दिली होती. त्यानुसार पालकमंत्र्यांच्या सूचनेवरून दि. ३० ऑगस्ट २०२४ रोजी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून २०२४-२५ अंतर्गत शिव शारदा बिल्डिंग जालना रोड ते अमरधाम स्मशानभूमी (मोंढा रोड) या कामासाठी ४ कोटी २० लक्ष रुपयांचा निधी मंजूर केला आहे. टेंडर प्रक्रिया जवळपास संपत आलेली आहे, वर्क ऑर्डर होताच येत्या आठ ते दहा दिवसात राज्याचे कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजयजी मुंडे यांच्या हस्ते व माजी आमदार अमरसिंहजी पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत या कामास प्रत्यक्ष सुरुवात होणार असल्याची माहिती नगरसेवक अमर नाईकवाडे व गटनेते फारुख पटेल यांनी दिली आहे. दरम्यान, येणाऱ्या काळात नवरात्र उत्सवामुळे नागरिकांची गैरसोय होऊ नये याची काळजी घेऊन सदरील रस्ता काम सुरू करण्यात येणार आहे. तसेच कार्यारंभ आदेश निर्गमित झाल्यानंतर आचारसंहितेचा कसलाही परिणाम या कामावर होणार नाही त्यामुळे नागरिकांनी अफवांना बळी पडू नये असे आवाहन देखील नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी केले आहे.

पान १ वरून

### खळबळजनक : स्वाराती रूग्णालयात...

कंत्राटदाराने बनावट औषधीचा पुरवठा केल्याचे अन्न व औषध प्रशासनाच्या तपासणीत उघड झाले आहे. या प्रकरणी औषधी निरिक्षक मनोज पैठणे यांच्या फिर्यादीवरून सुरेश दत्तात्रय पाटील, मिहीर त्रिवेदी (रा. भिवंडी, जि.ठाणे),द्विती सुमित त्रिवेदी (रा. सुरत) आणि विजय शैलेद्र चौधरी (रा. मिरा रोड ठाणे) या चौघांवर अंबाजोगाई शहर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर बनावट औषध निर्मिती आणि विक्रीच्या मागे आंतरराज्यीय टोळी असून अनेक राज्यात त्यांचे जाळे पसरले असण्याची शक्यता देखील फिर्यादीत व्यक्त करण्यात आली आहे. पुढील तपास एपीआय कांबळे करत आहेत.

### महापालिका निवडणूकांसाठी...

असे मोठे विधान देवेंद्र फडणवीस यांनी केले. दरम्यान, माझे स्नेही आणि भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्रातील नेते देवेंद्र फडणवीस यांनी तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली, याबद्दल त्यांचे अभिनंदन. २०१९ ला खरेतर ही संधी त्यांना मिळायला हवी होती, पण तेंव्हा आणि पुढे २०२२ मध्ये जे घडले त्यामुळे ती संधी हुकली. असो, पण यावेळेस महाराष्ट्रातील जनतेने महायुतीला म्हणण्यापेक्षा देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाला जे प्रचंड

पान १ वरून

अविश्वसनीय बहुमत दिले आहे, त्याचा या राज्यासाठी, इथल्या मराठी माणसांसाठी आणि मराठी भाषा आणि संस्कृतीसाठी तुम्ही योग्य वापर कराल अशी मी आशा करतो. पुढची ५ वर्ष सरकारच्या कुठल्याही चांगल्या उपक्रमांना माझा, माझ्या पक्षाचा पाठींबा असेल. पण सरकार चुकत आहे, लोकांना गृहीत धरत आहे, असे जर जाणवले, तर मात्र विधिमंडळात जरी सध्या शक्य नसले तरी, विधिमंडळाच्या बाहेर मात्र आम्ही सरकारला त्यांच्या चुकांची जाणीव करून देऊ हे नक्की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार आणि तसेच भविष्यातील त्यांच्या मंत्रिमंडळातील सर्व सहकाऱ्यांना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या शुभेच्छा!, अशी पोस्ट करत राज ठाकरे यांनी महायुतीला मनसे शुभेच्छा दिल्या होत्या.

### भाजपाचे ज्येष्ठ नेते...

अखेरचा श्वास घेतला. मधुकर पिचड यांच्या निधनामुळे अकोले तालुक्यावर शोककळा पसरली आहे. दरम्यान, मधुकर पिचड हे राज्याचे माजी मंत्री होते. अहिल्यानगर (अहमदनगर) अकोले विधानसभा मतदारसंघातून मधुकर पिचड हे तब्बल सात वेळा आमदार म्हणून निवडून आले होते. तसेच मधुकर पिचड यांनी अनेक महत्वाची पदे भुषवली आहेत. तसेच आदिवासी विकास, वन व पर्यावरण मंत्री म्हणून देखील कार्यभार त्यांनी पाहिला होता. अकोले तालुक्यामधील विकासात मधुकर पिचड यांचं महत्वाचं योगदान मानलं जातं. दरम्यान, २०१९ मध्ये मधुकर पिचड यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला होता.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

# सरपंच पुत्र व ग्रामसेवक यांनी अधिकारी यांना मॅनेज करून बनावट ग्रामसभा कागदपत्राचा बोगस कारभार

## चर्चा न करता, जाहीर प्रगट न करता बनवाबनवी करत शासनाची दिशाभूल

**वडवणी । प्रतिनिधी**

तालुक्यातील सोन्नाखोटा येथील रहिवासी चंद्रकांत बळीराम लांडे यांची ग्रामरोजगार सहाय्यक या पदावर नियुक्ती दि. २६/०४/२०२४ रोजी तत्कालीन ग्रामसेवक व सरपंच यांनी माजी नियमानुसार निवड केलेली आहे. तेव्हापासून गावात जलसिंचन, विहिरीचे, रस्त्याचे, वृक्षलागवडीचे, गायगोठ्याचे कामे प्रमाणीकपणे करत आहे. सरपंच सौ.आशाबाई बिभीषण खोटे व ग्रामसेवक मोहित सुभाष ससाणे यांनी पंचायत समितीचे संबंधित अधिकारी यांना मॅनेज करून बनावट ग्रामसभा कागदपत्री बोगस दाखवून मला व ग्रामस्थांना कसल्याच प्रकारचे न कळविता शासन आदेशा विरुद्ध गैरवर्तन करत माझ्यावर अन्याय केला आहे.

द्वितीय ग्राम रोजगार सहाय्यकांची आवश्यकता नसताना सरपंच यांच्या बनावट स्वाक्षऱ्या करून सरपंच पुत्र ऋषिकेश बिभीषण खोटे यांची पंचायत समितीचे अधिकारी यांना हाताशी धरून नियमबाह्य पणे द्वितीय ग्रामरोजगार सहाय्यकाची नेमणूक केली आहे. आलेल्या ग्राम सभेचे सर्व व्हिडिओ, चित्रीकरण, गलकॅम फोटो यांची तपासणी करण्यात यावी नियमबाह्य ग्रामसभा व नियमबाह्य द्वितीय ग्रामरोजगार सहाय्यक निवडीचा ठराव घेऊन दिशाभूल करणाऱ्या दोषी सरपंच ग्रामसेवक व वरिष्ठ अधिकारी यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी चंद्रकांत बळीराम लांडे यांनी निवेदनात केली आहे.

**माझ्या विरुद्ध तक्रार नसतांना केवळ राजकीय द्वेष मनात धरुन रस्त्याचे बोगस मस्टर व दुतर्फा वृक्षलागवडीचे बोगस मस्टर काडत नव्हतो म्हणून केवळ बनावट ग्रामसभा दाखवुन गैरवर्तन केले आहे. ग्रामस्थांना व आम्हाला यांनी कसल्याही प्रकारचे कोठेही चर्चा न करता जाहीर प्रगटन न करता बनवाबनवी करत शासनाची व माझी दिशाभुल केली आहे. नियम बाह्य ग्रामसभा व नियम बाह्य द्वितीय ग्रामरोजगार सहाय्यक निवडीचा ठराव घेऊन दिशाभूल करणाऱ्या दोषी सरपंच ग्रामसेवक व वरिष्ठ अधिकारी यांच्यावर कायदेशिर कार्यवाही करावी. व मला न्याय देण्यात यावा ही नम्र विनंती. – चंद्रकांत बळीराम लांडे, ग्रामरोजगार सहाय्यक सोन्नाखोट्टा**

## जवळा हायस्कूल जवळा येथे महापरिनिर्वाण दीन साजरा



**म्हाळस जवळा । प्रतिनिधी**

डॉ.आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस विनम्र अभिवादन करतांना शाळेचे मुख्याध्यापक श्री.डोंगरदिवे सर, सोबत श्री. इंगोले सर, श्री. सरवदे सर, श्रीमती सोनवणे मॅडम आणि सर्व कर्मचारी वृंद डॉ.भीमराव पिंगळे विद्यालय, धानोरा रोड, बीड. यावेळी डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा, कर्तृत्वाचा आणि दूरदृष्टीचा आढावा घेताना शाळेचे मुख्याध्यापक श्री. डोंगरदिवे सर यांनी व्यवस्थेत सामाजिक आणि आर्थिक समानतेची व प्रजासत्ताकात लोकांच्या वैचारिक व मानसिक प्रगल्भतेची खूप मोठी गरज आहे आणि ती गरज डॉ. आंबेडकरांच्या चरित्र्यातून ऊर्जेच्या स्वरूपात सहज मिळू शकते, असे प्रतिपादित केले.

# श्री क्षेत्र दत्त संस्थान येथे भव्य अखंड हरिनाम सप्ताह व किर्तन महोत्सवाचे आयोजन

## दत्तउपासक गुरुवर्य श्रीहरी महाराज पवार यांच्या अधिपत्याखाली दत्त जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र दत्त संस्थान,कोल्हारवाडी फाटा,बार्शी रोड,बीड येथे १५ वर्षांची परंपरा असलेल्या दत्त जन्मोत्सवा निमित्त दि.८ ते १५ डिसेंबर या कालावधीत भव्य अखंड हरिनाम सप्ताह व किर्तन महोत्सव, श्रीमद् गुरुचरित्र पारायण व दत्त जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन केले आहे यामध्ये काकडा भजन,विष्णु सहस्त्रनाम,गुरुचरित्र पारायण,गाथा भजन,दत्त महामाला मंत्र सामुदायिक पाठ,प्रवचन,हरिपाठ, श्रींची महाआरती,हरिजागर व अखंड अन्नदान असे दैनंदिन कार्यक्रमाचे स्वरूप आहे.



महाराष्ट्रातील नामवंत किर्तनकार दररोज रात्री ९ ते ११ या वेळेत सेवा देणार असून यामध्ये रविवार दि.८ डिसेंबर रोजी ह.भ.प.रामराव म.ढोक,सोमवार दि.९ रोजी ह.भ.प.बाळकृष्ण दादा वसंतगडकर,मंगळवार दि.१० रोजी ह.भ.प.नाना म.कदम,बुधवार दि.११ रोजी ह.भ.प.ज्ञानेश्वर म.तांबे,गुरुवार दि.१२ रोजी ह.भ.प.समाधान म.भोजेकर,शुक्रवार दि.१३ रोजी ह.भ.प.वनिता ताई पाटील,शनिवार दि.१४ रोजी ह.भ.प.तुकाराम म.मुंडे यांची किर्तन सेवा होणार आहेत.

रविवार दि.१५ डिसेंबर रोजी सकाळी ११ ते १ ह.भ.प.संजीवदास म.पाटील यांचे काल्याचे किर्तन होईल व तदनंतर महाप्रसाद होईल; दु.१२.३५ मि.दत्त जन्मोत्सव होईल व रात्री ७ ते १० श्रींचा पालखी उत्सव होईल तरी बीड शहर व पंचक्रोशीतील भाविकांनी दत्त जन्मोत्सव सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री क्षेत्र दत्त संस्थानचे दत्तउपासक गुरुवर्य श्रीहरी महाराज पवार यांनी केले आहे.

### सामुदायिक गुरुचरित्र पारायणाचा लाभ घ्यावा

**दत्त जन्मोत्सव सोहळ्यात रविवार दि.८ डिसेंबर रोजी सकाळी ८ वाजता शोभायात्रे नंतर पारायणास सुरूवात होणार असून यामध्ये ५०० भाविक सामुदायिक गुरुचरित्र पारायणाचा लाभ घेणार आहेत.**

# लोहा न.पा.त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

**लोहा । प्रतिनिधी**

महापरिनिर्वाण दिनानिमित्त लोहा न पा येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी उल्हास राठोड कार्यालयीन अधीक्षक,



अजिंक्य केंद्रे लेखापाल, ढवळे मॅडम,जाधव मॅडम, शिंदे मॅडम, शंकर वाघमारे, गायकवाड साहेब, विष्णू भिसे, चांदू राजकोर, जितू टेवरे, सदानंद धुतमल आदी सह इतर नगर परिषद कर्मचारी उपस्थित होते.

# श्री नारायण विद्यालयात डॉ बाबासाहेब आंबेडकर महापरीनिर्वाण दिन

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील श्री नारायण मा. व उ. मा. विद्यालय आहेर चिंचोली येथे भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री महादेवरावजी काळे अण्णा होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव तथा प्राचार्य अमोल काळे सर, सौ राजश्री काळे/ पिंगळे मॅडम, श्री मस्के सर , श्री इनकर सर, श्री शेख सर, सौ भूतावळे मॅडम हे होते . मान्यवरांच्या शुभहस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.

कु. अनुष्का काशीद या विद्यार्थिनींनीने भाषण केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री मस्के सर यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करपे सर यांनी केले आभार श्री शेख सर यांनी मानले .कार्यक्रमाला प्राध्यापक अशोक घरत सर ,श्री पौळ डी. बी,श्री चव्हाण वाय डी.,श्री रकटे एन पी, श्री मुरमुडे ए. एन.,श्री रकटे बी आर., श्री पवार एल टी., श्री चौधरी सर, श्री रकटे पि. आर,



यावेळी कार्यक्रमाला विद्यार्थी, विद्यार्थिनी ,शिक्षकवृंद, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. २४६/२०२४**

**संजय पि आण्णासाहेब रणदिवे विरूद्ध न.प. बीड**

पहा

१. संजय पि. बाबासाहेब रणदिवे

रा. नित्रुड ता. माजलगांव जि. बीड.

उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत क्रांती संजय रणदिवे यांचा दिनांक २१/०९/२०१७ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास न.प.बीड ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन,त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे बीड ता.जि.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०५/१२/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख २०/१२/२०२४ ही आहे.

**ॲड. अजित. एम. देशमुख**

शिक्का

**आदेशावरून.**
(स्वाक्षरीत)
तहसिलदार,
बीड

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

### मा. के सी बागल मॅडम, ८ वे दिवाणी न्यायाधीश क.स्तर बीड ता. जि.बीड यांचे न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक : १७४६/२०२४**

**मनिषा व इतर – वि . – निरंक**

**( मार्फत– ॲड. एस.आर. उजगरे बीड )**

ज्याअर्थी मयत नामे **अजय पि. शहाजी घुमरे रा. भाग्यनगर, बीड ता.जि.बीड हे दि. १६/१०/२०२४ रोजी मौजे बीड ता.जि.बीड** येथे मयत झाले आहेत.

अर्जदार –

१) मनिषा भ्र. अजय घुमरे वय ३८ वर्षे धंदा घरकाम

२) शहाजी पि. ज्ञानोबा घुमरे वय ७७ वर्षे धंदा सेवानिवृत्त

३) कुसुम भ्र. शहाजी घुमरे वय ६९ वर्षे धंदा घरकाम सर्व रा. भाग्यनगर, बीड ता.जि.बीड

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता

मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरह मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकतो न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लांगलीच सवा सेवन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर संयत नाम अजय पि. शहाजी घुमरे रा. भाग्यनगर, बीड ता.जि.बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज ०५/१२/२०२४ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**पुढील तारीख : २०/०१/२०२५**

(स्वाक्षरीत)
क.लिपीक

शिक्का

**आदेशावरून.**
(स्वाक्षरीत)
अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

# रक्तदान सर्वश्रेष्ठ दान

**आज दिनांक ७ डिसेंबर रोजी लोकनेते मा जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त बीड तालुक्यात विविध ठिकाणी रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.सध्या जिल्हा मधे रुग्णांना प्रचंड प्रमाणात रक्त तुटवडा जाणवत आहे त्यामुळे रुग्णांचेप्राण वाचविण्यासाठी या शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.तरी यात नागरिकांनी उस्फुर्त प्रतिसाद देऊन सहकार्य करावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.**
यानिमित्ताने रक्तदानाची माहिती पुढीलप्रमाणे देत आहोत.




रक्तदान हे एखाद्या व्यक्तीने स्वेच्छेने अंगातून रक्त काढून देण्याची क्रिया आहे. असे रक्त रोग्याच्या शरीरात चढवण्यापूर्वी बायोफामस्युटिकल प्रक्रियेद्वारे त्याचे विभाजन केले जाते, व संपूर्ण रक्त (थहेश्रश इश्रेव) किंवा रक्ताचा आवश्यक तोच घटक रोग्याच्या शरीरात इंजेक्ट केला जातो. रक्त संकलन प्रक्रियेत रक्त बँकांचा सहभाग असतो.

रक्तदानाचे प्रतिक– बहुतेक रक्तदाते (स्वयंसेवक) स्वखुशीने अणि विनामोबदला रक्तदान करतात. काही देशांमध्ये, रक्ताचा पुरवठा मर्यादित आहे, कारण देणगीदार फक्त नातेवाईकांसाठी किंवा मित्रांसाठीच रक्तदान करतात. अनेक रक्तदाते रक्तदान एक देणगी म्हणून करतात. परंतु ज्या देशांमध्ये रक्त विकण्याची परवानगी आहे तिथे रक्तदात्यांना पैसे मिळतात. रक्तदानासाठी काही ठिकाणी कामकाजावरून मोकळा वेळ दिला जातो.

अपघातात झालेला अतिरिक्त रक्तस्राव, थलेसोमिया, रक्तक्षय, रक्ताचा कर्करोग, प्रसूतिपश्चात रक्तस्राव, शस्त्रक्रिया आणि इतर गंभीर आजारांमधे योग्यवेळी रुग्णाला रक्त मिळाले नाही तर तो रुग्ण दगावण्याची शक्यता असते. अशावेळी एका मानवाचेच रक्त दुसऱ्या मानवाचे प्राण वाचवू शकते. कारण मानवाचे रक्त कोणत्याही कारखान्यात तयार होत नाही व दुसऱ्या कोणत्याही प्राण्याचे रक्त मानवासाठी उपयोगात येऊ शकत नाही, त्यामुळे रक्तदानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

महाराष्ट्र राज्यात रुग्णांसाठी दरवर्षी सुमारे साडेसात लाख बाटल्या रक्त लागते. ही गरज ७० ते ७५ टक्के पर्यायी बदली रक्तदाता किंवा व्यावसायिक रक्तदात्याकडून भागविली जाते.

मानवाच्या शरीरामधे साडेचार ते पाच लिटर रक्त असते. रक्तदानाच्या वेळी केवळ ३०० मिली. रक्त काढले जाते. प्रत्येक रक्तदानानंतर साधारण ३६ तासांमधे शरीरात रक्ताची पातळी पूर्ववत होते. तसेच साधारण २ ते ३ आठवड्यांमधे रक्तपेशीही पूर्ववत होतात. रक्तदान केल्याने कोणताही त्रास किंवा इजा होत नाही.

ब्लड बँकेच्या रेफ्रिजरेटरमध्ये रक्त ४–५ आठवड्यांपर्यंत रक्त सुरक्षित ठेवता येते. रक्तदानामुळे प्रत्येक वर्षी अनेकांना जीवनदान मिळते. अनेक मोठ्या सर्जरींमध्ये किंवा गंभीर परिस्थितीत रक्तदानामुळे पेशंटचे प्राण वाचण्यास मदत होते. तसेच गरोदरपणात बाळाचे आणि आईचे प्राण वाचण्यास रक्तदान महत्त्वाचे कार्य करते. भारत देशात १२० कोटी लोकसंख्या असूनही केवळ ७४ लाख ते १ कोटी २० लाख लिटर रक्त संकलित होते. रक्त न मिळाल्यामुळे मृत्यूचे प्रमाण देशभरात १५ ते २० टक्के आहे. भारतात केवळ ०.६ टक्के लोक रक्तदान करतात.

रक्तदान कोणी, केव्हा व कुठे करावे:

१)वयाच्या १८ वर्षानंतर (६०वर्षापर्यंत), २)वजन ४०कि.ग्रॅ.च्या वर असल्यास, ३)रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण कमीत कमी १२.५ ग्रॅम असल्यास, ४)रक्तदाता पूर्णपणे निरोगी असल्यास, निरोगी माणसाला दर ३ महिन्यांनी जवळच्या रक्तपेढीत किंवा कोठेही आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात रक्तदान करता येते.

रक्तदानाचे फायदे:

१)रक्ताची तपासणी होते (एच.आय.व्ही., गुप्त रोग, कावीळ–ब, क प्रकारची, मलेरिया) २)वजन, तापमान, रक्तदाब व नाडी परीक्षण होते, ३)रक्तगट व हिमोग्लोबिनच्या प्रमाणाबाबत माहिती मिळते, ४)बोन मॅरोमध्ये नवीन रक्त तयार करण्याची कार्यक्षमता वाढते, ५)नवीन तयार झालेल्या रक्तपेशी व रक्तरस यामुळे रोग प्रतिकार शक्ती वाढून शरीरात चैतन्य निर्माण होते, ६)नियमित रक्तदान केल्याने शरीरातील लोहाचे प्रमाण आवश्यकतेपेक्षा जास्त वाढत नाही. त्यामुळे हृदय–यकृतासारखे अवयव निरोगी राहतात, ७) समाजाचे ऋण फेडायची ही एक संधी रक्तदानामुळे मिळते,

रक्ताची गरज कुणाला आहे, तुलाही आहे मलाही आहे. रक्त कधी कारखान्यात बनेल का? नाही ना, आपल्याला रक्तदान करावेच लागणार! जसा पाण्याचा थेंब न् थेंब धरणात साठायला हवा, तसा रक्ताचा थेंब न् थेंब रक्तपेढीत साठवायला हवा

**–डॉ अरुण भस्मे,बीड**

पान ४ वरून पुढे...

## युवा महोत्सवातून...

मंगेश वडमारे आदींनी परीश्रम घेतले.

युवा महोत्सवा करिता परीक्षक म्हणून प्रा. डॉ. बी. टी. ताटे, प्रा. एस. के. परदेशी, प्रा. डॉ. संजय कांबळे, प्रा. डॉ पुनम ओहरी, प्रा. रोहीनी धारमोडे, सुमीत गायकवाड, वाघ राधाकृष्ण, लक्षीकांत दोडके, विलास सोनवने, प्रा. दिपक जमदाळे, प्रा. डॉ. संतोष मस्के, प्रदिप मांजरे, प्रा. डॉ. पांडुरंग सुतार, प्रा. राम गव्हाणे यांनी काम पाहीले.

जिल्हास्तर युवा महोत्सवाचा निकाल पुढील प्रमाणे आहे.–१) समुह लोकनृत्य:– प्रथम क्रमांक– श्री.नरेंद्र मोदी परिचारिका प्रशिक्षण संस्था,केज, जि. बीड,

व्दितीय क्रमांक – बलभिम महाविद्यालय, बीड

२) समुह लोकगीत:– प्रथम क्रमांक – सौ. के. एस. के. महाविद्यालय, बीड, व्दितीय क्रमांक– बलभिम महाविद्यालय, बीड, तृतीय क्रमांक – तुलसी महाविद्यालय, बीड

३) वक्तृत्व स्पर्धा (हिंदी / इंग्रजी )
प्रथम क्रमांक– अमृता श्रीकांत क्षिरसागर,
व्दितीय क्रमांक – उम्मे हानी नुराब अत्तार,
तृतीय क्रमांक – चव्हाण रोहन नामदेव,
तृतीय क्रमांक – साक्षी उध्दवराव कराड

४) चित्रकला
प्रथम क्रमांक– विशाखा विकास आगळे
व्दितीय क्रमांक – ऋतुजा जालिंदर काळे,
तृतीय क्रमांक– वैष्णवी ज्ञानेश्वर चौरे

५) कथालेखन
प्रथम क्रमांक– सुरज राधाकिसन उफाडे
व्दितीय क्रमांक – साक्षी उध्दवराव कराड
तृतीय क्रमांक – रंजित दिलीप शिंदे

६) कविता लेखन
प्रथम क्रमांक– सुरज राधाकिसन उफाडे
व्दितीय क्रमांक – साक्षी उध्दवराव कराड
तृतीय क्रमांक – अंजली जालिंदर शिंदे

७) विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नवसंकल्पना
प्रथम क्रमांक– बलभिम महाविद्यालय, बीड
व्दितीय क्रमांक – न्यु इरा पब्लिक स्कूल, गेवराई, जि. बीड
तृतीय क्रमांक– स्वा. सावरकर उच्च माध्यमिक विद्यालय, बीड.

## एकलव्य रेसिडेंशियल...

मोरे यांनी केले आहे. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी, पांढरकवडा, किनवट, अकोला, छत्रपती संभाजीनगर, पुसद, कळमनुरी यांच्या कार्यक्षेत्रात असलेल्या १२ जिल्ह्यातील सर्व शासकीय व अनुदानित आश्रमशाळा जिल्हा परिषद, नगरपालिका व महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक शाळा, सर्व शासन मान्य अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळेतील सन २०२४–२५ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ५ वी, ६ वी, ७ वी व ८ वी मध्ये शिकत असलेल्या अनुसूचित, आदिम जमातीचे विद्यार्थी या स्पर्धा परीक्षेसाठी पात्र राहातील. नमूद सर्व शाळेतील मुख्याध्यापक यांनी प्रवेश परीक्षेचे आवेदन पत्र विद्यार्थ्यांकडून भरुन घेऊन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडे मुदतीत सादर करावेत, असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

## माजलगांवच्या खंडोबा...

लाईट बंद करण्यात आली .दिव्यानीं मंदीर परिसर उजलुन निघाले .दिव्यांच्या प्रकाशामध्ये भक्तांचा हस्ते आरती करण्यात आली .यावेळी येलकट येलकट जय मल्हार चा गजर करण्यात आला .दिपोत्सव पाहण्यासाठी भक्तांनी गर्दी केली होती .

## मुख्यमंत्रीपदी देवेंद्र...

यांची मुख्यमंत्रीपदी निवड झाल्याबद्दल एस.एम. देशमुख यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.. देवेंद्र फडणवीस यांच्या काळात पत्रकारांचे सर्व प्रश्न मार्गी लागतील अशी अपेक्षा एस.एम.देशमुख यांनी व्यक्त केली आहे.

## दिंद्रुडच्या देवेंद्र...

सर्वपरिचित आहेत. वैद्यकीय समस्या सोबतच जनतेची अनेक कामे येथे मार्गी लागतात.


साहजिकच ज्यांच्या नावाने दरबार भरतो, ते देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यानंतर कार्यकर्त्यांच्या आनंदाला पारावर राहिला नाही. या दरबारातील स्क्रीनवर सर्वांनी हा नेत्रदीपक व भव्य दिव्य सोहळा प्रत्यक्ष अनुभवला. तसेच एकमेकांना मिठाईचे वाटप करत फटाक्यांची अतिषबाजी केली. दूरदृष्टी व विकासाची आस असलेल्या महायुती सरकारमुळे आपला महाराष्ट्र जास्त वेगाने पुढे जाईल अशा भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या. तसेच नव्याने जनसेवेत रुजू झालेल्या आपल्या सरकारचे अभिनंदन करत वेगवान कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

दैनिक ● epaper.marathwadapatra.com

शनिवार, दि.०७ डिसेंबर २०२४ पान ४

# मराठवाडा पत्र

● dailymarathwadapatra2021@gmail.com ■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■ Mo. 9822152955



दिवसभर धावपळ, कुठेतरी विसावी
निवांत सांजवेळ, साथ तुझी मिळवी.
निसर्ग रम्य छायाचित्र डॉ. वशिष्ठ चोले यांनी टिपलेले.

# युवा महोत्सवातून देशाचे भविष्य घडण्यास मदत : शिवकुमार स्वामी

### ▸दोन दिवसीय युवा महोत्सवाचा समारोप

बीड । प्रतिनिधी

बीडच्या युवकांमध्ये कलागुणांची खान आहे. बीड जिल्ह्यातील युवकांसाठी जिल्हास्तर युवा महोत्सव आयोजन समिती मार्फत युवा महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत चांगल्या प्रकारचे झालेले आहे. युवकांना अशा महोत्सवातून प्रोत्साहन मिळते. यातूनच देशाचे भविष्य घडण्यासही मदत होते, असे प्रतिपादन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी केले.



जिल्हा क्रीडा संकुल येथे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, नेहरू युवा केंद्र यांच्या वतीने आयोजित दोन दिवसीय जिल्हास्तर युवा महोत्सव (ता. ०५) समारोपप्रसंगी ते बोलत होते. जेष्ठ क्रीडा संघटक तथा शिव छत्रपती पुरस्कारार्थी प्रा. जे. पी. शेळके, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, जिल्हा युवा अधिकारी अरूणा कोचुरे, उसतोड कामगार संघटनेचे अध्यक्ष उध्दव कराड, जेष्ठ क्रीडा व युवा संघटक प्रा. दिनकर थोरात, कलावंत तथा साने गुरूजी क. महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती डॉ. कविता कराड आदींची उपस्थिती होती.

सदर युवा महोत्सवात सहभागी होऊन प्राविण्य मिळवणाऱ्या युवकांना विभागस्तर युवा महोत्सवासाठी शुभेच्छा देवून जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवकांची राज्य व राष्ट्रयस्तरावरील युवा महोत्सवासाठी निवड व्हावी, अशी अपेक्षाही श्री. स्वामी यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यागर यांनी केले. सूत्रसंचालन पंडित चव्हाण केले. आभार श्रीमती कोचुरे यांनी मानले.

दिनांक ०५ डिसेंबर २०२४ रोजी कविता लेखन, कथालेखन, चित्रकला स्पर्धा, विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नवसंकल्पना या बाबींच्या स्पर्धा घेण्यात आल्या. दिनांक ०४ व ०५ डिसेंबर २०२४ रोजी झालेल्या स्पर्धात्मक बाबीमध्ये प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक मिळविलेल्या कलाकरांना निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांचे हस्ते व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत ट्रॉफी (चषक) देऊन गौरविण्यात आले.

जिल्हास्तर युवा महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी तालुका क्रीडा अधिकारी पंडित चव्हाण, क्रीडा अधिकारी अनिकेत काळे, कालिदास होसुरकर, क्रीडा म ार्गदर्शक सतिष राठोड, रेवनाथ शेलार, अविनाश पाटील, क्रीडा विभागाचे धनेश करांडे, श्रीमती त्रिगुणा वाघमोडे, क्रीडा संयोजक जितेंद्र आराक, सचिन जाधव, किशोर काळे, ▶▶ उर्वरित पान ३ वर

## पार्थ पवार यांची डॉ.योगेश क्षीरसागर यांनी घेतली भेट



बीड । प्रतिनिधी

मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते पार्थ अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सदिच्छा भेट घेतली. पार्थ पवार यांनी बीड विधानसभा निवडणुकीबाबत चर्चा केली. तसेच, पक्षाच्या कामाची माहिती जाणून घेतली. यावेळी पार्थ पवार यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माजी नगरसेवक रविंद्र कदम, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दीकी, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे उपस्थित होते.

## एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कुलमध्ये प्रवेशासाठी आवाहन

बीड । प्रतिनिधी

इंग्रजी माध्यमाच्या एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कुलमध्ये प्रवेशासाठी रविवार, २३ फेब्रुवारी २०२५ रोजी आयोजित स्पर्धा परीक्षा होणार आहे. यासाठी विहित नमुन्यातील अर्ज संबंधित शासकीय आश्रमशाळेतील मुख्याध्यापक किंवा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडे विनाम ुल्य उपलब्ध आहेत. सदर अर्ज २५ जानेवारी, २०२५ पर्यंत संबंधित प्रकल्प कार्यालयाकडे मुख्याध्यापकांमार्फत सादर करावेत, असे आवाहन छत्रपती संभाजी नगरच्या आदिवासी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी चेतना ▶▶ उर्वरित पान ३ वर

## माजलगांवच्या खंडोबा मंदीरात सदानंदाचा येलकट येलकट जय मल्हार चा गजरात दिपोत्सव साजरा

माजलगांव । प्रतिनिधी

आठरा पगड जातींचा म ाजलगांचा देव श्री खंडोबा मंदीरात नागदेवे निम्मित शुक्रवार रोजी सायंकाळी सात वाजता भक्तांचा उपस्थित २१०० दिवे लावून दिपोत्सव साजरा केला.

माजलगांव येथील सर्वांचे आराध्य दैवत व कुलदैवत श्री खंडोबा मंदीरात शुक्रवार रोजी सकाळ पासुन भक्तांनी दिपोत्सव ची जयत तैयारीला सुरवात केली मंदीरात रंग -बेंरगी रांगोली काढुन ,जय मल्हार नावाची प्रतिकृती ,स्वतिक दिव्याने काढुन व मंदीर दिव्यानी सजवली .दिव्यामध्ये तेल टाकुन कापसाची वात टाकुन बुधवारी सायकाळी २१०० दिवे( पणती ) लावून मंदीर परिसरातील सर्व ▶▶ उर्वरित पान ३ वर



## मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस यांची निवड झाल्याबद्दल एस.एम.देशमुख कडून अभिनंदन

### पत्रकार संरक्षण कायद्याचं नोटिफिकेशन काढु ; पेन्शन वाढीच्या संदर्भातही लवकरच निर्णय: मुख्यमंत्री

मुंबई । प्रतिनिधी

देवेंद्र फडणवीस पहिल्यांदा मुख्यमंत्री असताना महाराष्ट्रात २०१७ मध्ये पत्रकार संरक्षण कायदा झाला.. मात्र त्याचे नोटिफिकेशन निघाले नाही.. त्यामुळे कायदा झाला असला तरी त्याची अंमलबजावणी झालेला नाही..

आज देवेंद्र फडणवीस यांच्या पहिल्याच पत्रकार परिषदेत मराठी पत्रकार परिषदेचे मुंबई विभागीय सचिव दीपक कैतके यांनी देवेंद्र फडणवीस यांना या संदर्भात प्रश्न विचारला असता त्यांनी लवकरच नोटिफिकेशन काढून कायदयाची अंमलबजावणी करण्यात येईल असे आश्वासन दिले. एस.एम देशम ुख यांच्या नेतृत्वाखाली मराठी पत्रकार परिषदेने सतत बारा वर्षे लढा दिल्यानंतर राज्यात २०१७ मध्ये पत्रकार संरक्षण कायदा झाला होता.. त्यावर राष्ट्रपतींची स्वाक्षरी झाली आणि कायदा गॅझेट मध्ये आला.. मात्र त्याचे राज्य सरकारने नोटिफिकेशन न काढल्याने कायदा अंमलात आलेला नाही.. त्यामुळे पुन्हा एकदा पत्रकारांवरील हल्ले वाढले आहेत. ही बाब दीपक कैतके यांनी आज मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. पत्रकार पेन्शन वाढीच्या संदर्भातही लवकरच निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले. दरम्यान देवेंद्र फडणवीस



▶▶ उर्वरित पान ३ वर



*भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शिवसेना जिल्हा प्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी उपस्थित शिवसेनेचे तालुकाप्रमुख गोरख आण्णा सिंघण, युवानेते विनोद गूंड पाटील, युवानेते अजयजी गायकवाड सह सर्व उपस्थित होते.*

## दिंद्रुडच्या देवेंद्र दरबारात आनंदोत्सव मिठाईचे वाटप, फटाक्यांची अतिषबाजी

माजलगांव । प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या राजधानीत महायुती सरकारचा शपथविधी अगदी भव्य दिव्य पद्धतीने संपन्न झाला. सोहळा संपन्न होताच दिंद्रूड येथील देवेंद्र दरबारात देवदूत प्रतिष्ठान व भाजपा कार्यकर्त्यांकडून जल्लोषात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. कार्यकर्त्यांनी एकमेकांना मिठाईचे वाटप करत फटाक्यांची अतिषबाजी केली. यावेळी भारतीय जनता पार्टी व देवेंद्र फडणवीस यांच्या नावाचा जयघोष करण्यात आला.



माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे मागच्या अनेक वर्षांपासून दर आठवड्याला देवेंद्र दरबार भरतो. आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे या दरबारात बसून सर्वसामान्यांची कामे मार्गी लावतात. गरजवंतांना हक्काचा असलेला हा देवेंद्र दरबार वरचेवर लोकप्रिय होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अत्यंत विश्वासू व मर्जीतील असलेले डॉ. ओमप्रकाश शेटे आरोग्य दूत म्हणून ▶▶ उर्वरित पान ३ वर

## एस.के.एच.वैद्यकिय महाविद्यालय येथे दिव्यांग शिबीराचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

जगप्रसिद्ध होमिओपॅथिक तज्ञ कै.डॉ प्रफुल्ल विजयकर यांच्या संकल्पनेतून आणि आधारस्तंभ माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या प्रेरणेतून २००९ पासून सोनाजीराव क्षीरसागर होमि ओपॅथिक वैद्यकिय महाविद्यालय बीड येथे मतिमंद, गतिमंद, सेरेब्रल पल्सी (लशीशलीरश्र रिश्री), कर्णबधीरता, मूकबधिरपणा, लहान मुलांचे असाध्य आजार, झटके येणे अशा विविध प्रकारच्या आजारांवर होमिओपॅथिक औषध-उपचार शिबीर आयोजित होत आहेत. आतापर्यंत जवळपास ५००० हून अधिक रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला आहे. हे शिबिर दर तीन ते चार महिन्यांच्या अंतराने नियमितपणे आयोजित होत आहेत. होमिओपॅथिक चिकित्सा पद्धतीच्या सिद्धांतानुसार रुग्णाची सखोल माहिती घेऊन होमिओपॅथिक औषध उपचार केले जातात. हे शिबिर दि. ०८ डिसेंबर २०२४ (वेळ: सकाळी ८.००) रोजी होणार आहे. ज्या रुग्णांना याचा लाभ घ्यायचा आहे त्यांनी मुळी ९५०३८७५३११ (सोशल वर्कर, बीड) यांना संपर्क करून नाव नोंदणी करावी अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेंद्र गोशाल, उपप्राचार्य गणेश पांगरकर, डॉ.अमित भस्मे, डॉ. रत्ना क्षीरसागर, डॉ.शेख नासेर यांनी दिली.

# आमच्या सुरेश आण्णांना कॅबिनेट मंत्री पदाची संधी द्यावी सर्वसामान्यांना न्याय मिळण्यासाठी कॅबिनेट मंत्री होणे गरजेचे : उपसरपंच बंडू सोले

आष्टी । प्रतिनिधी

राज्यात महायुतीला ऐतिहासिक असा विजय मि ळाला आहे.आष्टी विधानसभा मतदारसंघात च्या सर्वांगीण विकासासाठी अठरापगड जातीला सोबत घेऊन गोरगरीब सर्वसामान्यांच्या सुख दुखात धावून जाणारे आमदार सुरेश धस हे विधानसभेच्या चौथ्या टर्म ला ८० हजाराचे मताधिक्य घेऊन मोठ्या मताधिक्याने विजयी झालेले आहेत. विधानपरिषद वरही त्यांनी पाच वर्षे काम अत्यंत चांगल्या पद्धतीने केले असून सर्वसामान्यांना न्याय मि ळण्यासाठी व महिला सुरक्षित राहण्यासाठी मतदारसंघातील शेतकरी सुखावला पाहिजे शाश्वत विकासासाठी तरुणांच्या रोजगारासाठी आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश



धस हे कॅबिनेट मंत्री होणे गरजेचे आहे. यासाठी सुरेश आण्णा धस यांना कॅबिनेट मंत्रीपद देऊन मतदारसंघाला व मतदार संघातील नागरीकांना न्याय द्यावा अशी मागणी वाळुंज गावचे उपसरपंच बंडू सोले यांनी केली आहे पुढे बोलताना ते म्हणाले की

आष्टी विधानसभा म तदारसंघाच्या गावागावांमध्ये रस्ते, वीज, पाणी देवस्थानचा विकास भक्तनिवास, तरुणांना रोजगाराची संधी, मतदान संघाच्या सर्वांगीण विकासासाठी विकासभिमुख नेतृत्व म्हणून सुरेश आण्णा धस यांची ओळख असून आमदार सुरेश धस हे लाडके नेतृत्व असून अठरापगड जातींना सोबत घेऊन चालणारा हा नेता आहे कोणत्याही परिस्थितीत न डगमगता कायम धाडसी निर्णय घेत आहेत अनेक जिव्हाळ्याचे प्रश्न त्यांनी मार्गी लावलेले आहेत. वेळोवेळी पोटतिडकीने त्यांनी सभागृहात मतदार संघाचे प्रश्न मांडले आहेत.कोरोनाच्या महामारीत देखील महाराष्ट्रात सर्वात अधिकचे कोविड सेंटर त्यांनी उभारून नागरिकांचे प्राण वाचवले आहेत. महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्रीपद देखील भुषविले आहे. त्यांच्या अनुभवाचा योग्य तो सन्मान करून त्यांना कॅबिनेट मंत्री पद द्यावे त्यांच्या अनुभवाचा आष्टी विधानसभा मतदारसंघात सह संपूर्ण महाराष्ट्राला फायदा होईल गोरगरीब कष्टकरी यांच्या न्यायासाठी आमदार सुरेश धस कॅबिनेट मंत्री होणे गरजेचे असल्याचे उपसरपंच बंडू सोले यांनी सांगितले.